महाराष्ट्र शासन

**वरिष्ठ पोलीस निरिक्षक कांदिवली पोलीस ठाणे, मुंबई**

**एस.व्ही.रोड. पारेख नगर, कांदिवली (पश्चिम),मुंबई ४०००६७**

**E Mail - kandivalipolicestation@gmail.com**

# :: प्रेस नोट ::

दिनांक :- २०/०८/२०२६

**अनिवासी भारतीय जेष्ठ नागरिकांची बॅक लॉकरमधील सोने काढुन फसवणुक करणा-या बॅक मॅनेजरला अटक करुन रक्कम रुपये ८१,८०,०००/- रुपयांचा मुददेमाल जप्त केलेबाबत.**

दिनांक १२/०८/२०२६ रोजी श्री. प्रदीप मोतीराम भाटीया, वय ७४ वर्षे, धंदा - सेवानिवृत्त दुबई, पत्ता रिम ४ फ्लॅट नं ५१२, ओघ मिथा रोड दुबई, भारतातील पत्ता - ६०२ ज्योती पार्क, आंबावाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई यांनी कांदिवली पोलीस ठाणेस फिर्यादींनी दिलेल्या गुन्हयाची हकिकत अशी की, फिर्यादी हे गेली ५२ वर्षापासुन त्यांचे कुटुंबासह दुबई येथे राहणेस आहेत. दि. २२/०३/२०२४ रोजी १५:०० वा. फिर्यादींनी त्यांचे ६१० ग्रॅम वजनाचे ८१,८०,०००/- रुपये किंमतीचे वेगवेगळे सोन्याचे दागिने  विश्वासाने इंडसइंड बॅक, एम.जी. रोड, कांदिवली (पश्चिम), मुंबई या बॅकेच्या लॉकरमध्ये सुरक्षिततेकरीता ठेवले व फिर्यादी पुन्हा दुबई येथे निघुन गेले. सुमारे २ वर्षानंतर श्री. भाटीया त्यांचे दागिने घेणेसाठी ते बॅकेत आले. त्यावेळी त्यांचे लॉकरमधुन सर्व दागिने कोणीतरी काढुन घेतल्याचे दिसुन आले. सदरबाबत कांदिवली पोलीस ठाणे गुरनं १०९५/२०२६, कलम ३१६(५) भा. न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करणेत आला.

सदर गुन्हयाचे तपासात मा. श्री. संदीप घुगे, पोलीस उप आयुक्त, उत्तर परि. -०२, मुंबई यांनी गुन्हयाचे गांभिर्य लक्षात घेवुन मा. श्री. संतोष धनवटे, सहाय्यक पोलीस आयुक्त, बोरिवली विभाग, मुंबई व श्री. करण सोनकवडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कांदिवली पोलीस ठाणे यांना तपासाबाबत मार्गदर्शन करुन गुन्हयाचा तपास कांदिवली पोलीस ठाणे, सायबर सेलचे सहाय्यक पोलीस निरीक्षक, श्री. दिपक कादबाने यांचेकडे देण्यात आला.

सदरचा गुन्हा सुमारे ०२ वर्षापुर्वी घडलेला असल्याने सीसीटिव्ही फुटेज व इतर तांत्रिक तपासात मर्यादा होत्या. तत्कालीन बॅकेतील स्टाफबाबत तसेच लॉकर वाटप प्रक्रियेबाबत माहिती घेतली. फिर्यादी यांना लॉकर उपलब्ध करुन देणारा इंडसइंड बॅकेचा तत्कालीन उपशाखा प्रबंधक कुलदिप रामचंद्र सहानी, वय ३५ वर्षे, रा. रुम नं. १३८९ ए, संतोषनगर, श्रीकृष्णानगर, गोरेगाव पुर्व, गुरुकुल स्कुलचे जवळ, मुंबई ४०००६५ याचे बॅक खात्यांबाबत माहिती घेतली. त्यामध्ये सुमारे २ वर्षात त्याचे बॅक खात्यात ९ कोटी रुपयांचे आर्थिक व्यवहार झाल्याचे दिसुन आले. त्यामध्ये सोने तारण ठेवणा-या आस्थापनांसोबत मोठया प्रमाणात व्यवहार दिसुन आले. त्यानंतर त्याने केलेले सर्व व्यवहार तपासुन त्याने सोने तारण ठेवणा-या संस्थाकडुन त्याने तारण ठेवलेल्या सोन्याचे दागिन्यांचे फोटो प्राप्त करुन फिर्यादी यांचेकडुन खात्री करुन सदरचे दागिने त्यांचेच असल्याबाबत निष्पन्न झाल्याने आरोपीस तात्काळ अटक करुन त्याचेकडुन फिर्यादी यांचे फसवणुक झालेले ६१० ग्रॅम वजनाचे  ८१,८०,०००/- रुपये किंमतीचा सोन्याचा मुद्देमाल आरोपीतास अटक करून ४ दिवसात जप्त करुन गुन्हा उघडकिस आणला आहे.

सदर कारवाई मा. श्री. देवेन भारती, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. श्री. मनोजकुमार शर्मा, पोलीस सह आयुक्त (का. व सु.), बृहन्मुंबई, मा. श्री. शशीकुमार मीना, अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, मुंबई, मा. श्री. संदीप घुगे, पोलीस उप आयुक्त, उत्तर परि.- ०२, मुंबई, मा. श्री. संतोष धनवटे, सहाय्यक पोलीस आयुक्त, बोरिवली विभाग, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली श्री. करण सोनकवडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कांदिवली पोलीस ठाणे, मुंबई, श्री. शेखर शिंदे पोलीस निरीक्षक (गुन्हे), मुंबई यांचे प्रत्यक्ष देखरेखीखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक दिपक कादबाने, पोलीस उप निरीक्षक रविंद्र चव्हाण, पोउपनिरी प्रमोद वाघ, पोउपनिरी विक्रम डुंबरे, पोशि. श्री. बाळकृष्ण खाडे, पोशि. श्री. संकेत सावंत, मपोशि श्रीमती जयश्री तलवारे यांनी पुर्ण केलेली आहे.